उक्त ४(१)(ड) (आठ) नुसार क्र

# महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई

५ वा मजला, एमएमटीसी हाऊस, प्लॉट नं. सी २२, ब्लॉक ई , वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व), मुंबई४०० ०५१ .

संकेतस्थळ– www.mahabocw.in
दुरध्वनी क्र. ०२२-२६५७२६३१/३२
ई-मेल- bocwwboardmaha@gmail.com

जा.क्र समिती-२०२३/नि.समिती/ प्र.क्र. १८/मंडळ-०१/८३१ दिनांक : 21 APR 2025

## कार्यालयीन आदेश

**विषय-** महिला तक्रार निवारण समिती गठीत करण्याबाबत..

**वाचा-** १.शासन निर्णय क्र.मवबाविवि क्र.मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि.१९.०६.२०१४

२. महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र.न्यायप्र.२०२३/प्र.क्र.२१/का-१५ दि.२६.०६.२०२३

३.उद्योग,ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१४१/काम-९ दि.२७.०६.२०२३

४.कामगार आयुक्त,महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र.काआ/आस्था/११-२०२२/महिला समिती/इबाका/कार्या-२/१००३० दि.१०.०८.२०२३

५.श्रीम.सरिता संजय कदम, राष्ट्रीय महिला समाज संस्था,चेंबूर यांचे पत्र दि.२६.०३.२०२५

शासकीय/निमशासकीय कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांच्या कार्यालयातील महिला अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली महिलांवरील लैगिंक छळास प्रतिबंध व त्या संबंधातील प्राप्त होणाऱ्या तक्रारीवर कार्यवाही करण्याकरिता समिती गठीत करण्याचे दि.१९ जून २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्देश दिलेले असून मा.सर्वोच्च न्यायालयाने Civil Appeal No.२४८२ of २०१४ ऑटोलियाने फर्नाडिस विरुध्द गोवा सरकार या न्यायालयीन प्रकरणात कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैगिंक छळाच्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी ऑनलाईन पोर्टल तयार करण्यात यावे तसेच त्या पोर्टलवर समितीच्या सदस्यांची सविस्तर माहिती देण्याबाबतचे निर्देश दिले आहेत.

त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ या कार्यालयातर्गंत कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैगिंक छळास प्रतिबंध करण्यासाठी आणि

त्यानुषंगाने कार्यवाहीकरण्याकरिता खालीलप्रमाणे तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम | पद |
|---|---|---|
| १ | श्रीम.राजश्री पाटील,जिल्हा कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| २ | श्रीम.मनिषा तु.कदम,सहाय्यक कामगार आयुक्त,मुंबई | सदस्य |
| ३ | श्रीम.वर्षा हाडके,सरकारी कामगार अधिकारी,मुंबई | सदस्य |
| ४ | श्रीम.मृणाल हु.मेश्राम,अधिक्षक, कार्यासन-१२,मुंबई | सदस्य |
| ५ | श्रीम.सरिता संजय कदम | अशासकीय सदस्य |
| ६ | श्री.बाबासो जाधव,लेखा अधिकारी | सदस्य |
| ७ | श्रीम.आकांक्षा पेडणेकर ,उप. जिल्हा कार्यकारी अधिकारी | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील.

अ) महिलाच्या लैगिंक छळाच्या तक्रारीची दखल घेणे

ब) तक्रारीत तथ्य आढळून आल्यास त्याबाबतचा शोध घेवून शिस्तभंगाची कार्यवाही करण्याकरिता शिफारस करणे.

क) या संबंधी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल विभागास सादर करणे.

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

(विवेक शं.कुंभार)
सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम
कामगार कल्याणकारी मंडळ,मुंबई

प्रति,
संबंधित अधिकारी/कर्मचारी/अ.शा.सदस्य

प्रत माहितीसाठी

१.उपसचिव (कामगार-९),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय,मुंबई

२.अवर सचिव (कामगार -७),उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय,मुंबई